2025 III 05 0930 Seat No. | | | | | |

Time : 3 Hours

**MARATHI (T.L.)**

Subject Code

| S | 1 | 1 | 3 | 3 |
|---|---|---|---|---|

**Total No. of Questions : 58** **(Printed Pages : 11)** **Maximum Marks : 80**

***सूचना :—*** (*i*) प्रश्नांचा क्रमांक स्पष्टपणे लिहा.

(*ii*) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहेत.

(*iii*) उजवीकडील अंक गुण दर्शवितात.

खालीलपैकी अचूक पर्याय निवडून पुढील विधाने पूर्ण करून पुन्हा लिहा : 3

1. मारुती चितमपल्ली दिवेआगर नजीकच्या कुडेगावला ......................

- सागर सीमेवरील प्राण्यांच्या अभ्यासाकरिता गेले होते.
- सागर सीमेवरील पक्षांच्या अभ्यासाकरिता गेले होते.
- सागर सीमेवरील जंगलाच्या अभ्यासाकरिता गेले होते.
- सागर सीमेवरील वृक्षांच्या अभ्यासाकरिता गेले होते.

2. आईपाशी ताकत उरली नसतानाही ती गोपू बरोबर जात होती कारण ......................

- गोपूने भाताच्या ओंब्या कुठून मिळवल्या ते तिला कळायला हवे होते.
- गोळा केलेले भात खप्परांत भाजायचे होते.
- तिला पोपटाने साठवलेले भात घ्यायचे होते.
- तिला आंबराईत विश्रांती घ्यायची होती.

3. लेखिकेने काश्मिरी मुलीला जुने जोड दिले ते पाहून .....................

- तिच्या गालावरून अश्रू खाली घरंगळले.
- तिचे डोळे खूपच काही सांगू लागले.
- तिच्या विशाल निळ्या डोळ्यांच्या पापण्या भिरभिरू लागल्या.
- तिला स्वर्ग मिळाल्याचा आनंद झाला.

खालील कोणतेही **दोन** उद्गार कोणी व कोणास उद्देशून काढले आहेत ते लिहा : 2

4. "असेल कोणातरी खोतांचं इनामदाराचं."

5. "अरे, तू इथवर आलास तरी कसा ?"

6. "अन् सर्वच प्रयोग फसले तर ?"

खालीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा : 2

7. मेजर रॉयना कोणता सन्मान मिळाला होता ?

8. सकाळी लेखिकेला कोणाच्या आवाजाने जाग आली ?

9. समुद्रविंचवाचे घर कसे दिसते ?

खालीलपैकी अचूक पर्याय निवडून पुढील पाठाच्या लेखकाचे नाव लिहा : 1

10. गोकूळ

- स. मा. गर्गे
- रा. ग. गडकरी
- ग. प्र. प्रधान
- रणजीत देसाई

खालीलपैकी अचूक पर्याय निवडून पुढील वाक्याच्या पाठाचे नाव लिहा : 1

11. माझं वनविभागात जाणं केवळ अपघात नव्हे :

- जंगलाचं देणं
- महावीरचक्रधारी मेजर भास्कर रॉय
- पेहलगाम
- खरा वैज्ञानिक कोण ?

खालीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यांत लिहा : 4

12. गोकुळच्या जन्माचे सार्थक कशामुळे झाले ?

13. आदित्यरावांची खोली कशी होती ?

14. सदूभाऊंनी लेखकाला दिलासा कसा दिला ?

खालीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे चार ते पाच वाक्यांत लिहा : 6

15. "आज शिवबा राजे शोभले" असे उद्गार दादोजी कोंडदेव यांनी का काढले ?

16. गाडेकाराचा मृत्यू कसा झाला ?

17. लक्ष्मीने 'शील' गुणाचे महत्त्व कसे सांगितले ?

खालीलपैकी अचूक पर्याय निवडून पुढील कवितेच्या ओळी पूर्ण करून पुन्हा लिहा : 3

18. मने इच्छा पुरविली ....................

- मने प्रतिमा स्थापिली
- मने मना पूजा केली
- मन माऊली सकळांची
- गती अथवा अधोगती

19. बळ हेच दुर्बळांना ....................

- देती पराक्रमाचे
- धर्मांध आक्रमाचे
- पावित्र्य संगमाचे
- अतिगूढ संभ्रमाचे

20. पुलाखाली कधी कसा ....................

- आकांत मांडला
- काळ्या रंगात भिजला
- कुंकूम वाहून गेला
- मस्तकावर कोरला

खालील कवितांच्या ओळींतील मोकळ्या जागी पर्यायी शब्दांपैकी योग्य शब्द घालून ओळी पूर्ण करून पुन्हा लिहा : 2

21. अवधी सत्ता आली हाता ।नामयाचा .................... दाता।।

- विठ्ठल
- रखुमाई
- तुकोबा
- खेचरी

22. कदा ऐकिली गोष्ट .................... धरीना.

- कानी
- जीवी
- मनी
- ध्यानी

खालीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा : 2

23. आगगाडी घाटात कशी शिरली ?

24. माय केव्हा हतबल झाली ?

25. हयगय केल्यामुळे काय होते ?

खालीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे तीन ते चार वाक्यांत लिहा : 6

26. संतांच्या सहवासात असलेल्या भक्तात घडून येणारे बदल संत नामदेवांनी कोणत्या उदाहरणांतून स्पष्ट केले आहेत ?

27. पक्षी व फुलपाखरे यांच्या संदर्भात कवी भा. रा. तांबे यांनी काय-काय सांगितले आहे ?

28. कवी समाजरुपि ईश्वराची पूजा कशी करायला सांगतो ?

29. 'द्रोह करणे' या वाक्प्रचाराचा खालीलपैकी कोणता अर्थ बरोबर आहे ? 1

- मैत्री करणे
- दोष देणे
- शत्रुत्व करणे
- दुखी करणे.

30. 'मन भरून येणे' या अर्थाचा खालीलपैकी कोणता वाक्प्रचार बरोबर आहे ? 1

- भारावून जाणे
- मुकस्तंभ बनणे
- कृतकृत्य वाटणे
- डोके बधिर होऊन जाणे

31. 'स्तब्ध बसणे' या वाक्प्रचाराच्या उपयोगाचे खालीलपैकी कोणते वाक्य बरोबर आहे ? 1

- मुख्याध्यापक वर्गात येताच सर्व विद्यार्थी स्तब्ध बसणे.
- मुख्याध्यापक वर्गात येताच सर्व विद्यार्थी शांत बसले.
- मुख्याध्यापक वर्गात येताच सर्व विद्यार्थी शांत बसणे.
- मुख्याध्यापक वर्गात येताच सर्व विद्यार्थी शांत बसले.

32. 'गाठ पडणे' या अर्थाच्या अचूक वाक्प्रचाराचे खालीलपैकी कोणते वाक्य बरोबर आहे. 1

- तन्मय शाळेतून घरी येत असताना त्याला मित्र दिसला.
- तन्मय शाळेतून येत असताना त्याची मित्राशी भेट झाली.
- तन्मय शाळेतून घरी येत असताना मित्राशी भांडला.
- तन्मय शाळेतून घरी येत असताना त्याची मित्राशी गाठ पडली.

33. प्रल्हादाच्या शरीरातून तेजोमय देवी बाहेर पडली या वाक्यातील 'तेजोमय' ................ 1

- नाम
- सर्वनाम
- विशेषण
- क्रियापद

34. खाडीच्या किनाऱ्याने आमची होडी झरझर जात होती. या वाक्यातील 'झरझर' ............. 1

- क्रियाविशेषण अव्यय
- शब्दयोगी अव्यय
- उभयान्वयी अव्यय
- केवलप्रयोगी अव्यय

35. पंत, तुम्ही यात लक्ष घालू नका. या वाक्यातील 'तुम्ही' ................ 1

- क्रियापद
- नाम
- विशेषण
- सर्वनाम

36. आमच्या घराजवळ आल्या<u>वर</u> मात्र मजा होई. या वाक्यातील 'वर' ............... 1

- क्रियाविशेषण अव्यय
- शब्दयोगी अव्यय
- उभयान्वयी अव्यय
- केवळप्रयोगी अव्यय

37. 'पाटील' या शब्दाचे भाववाचक नाम ................ 1

- पाटीलकी
- पाटीलाई
- पाटीलगिरी
- पाटीलपण

38. 'पूर्ण' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द ................ 1

- अर्धा
- संपूर्ण
- नापूर्ण
- अपूर्ण

39. खालील वाक्य भविष्यकाळात लिहा : 1

आमची गाडी पेहलगामच्या अड्ड्यावर थांबली.

40. खालील कोणत्याही **एका** शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा : 1

- काटकसरीने खर्च करणारा
- विंचवाच्या आकाराची लहान, वाकडी कट्यार

41. खालील कोणत्याही **एका** शब्दाचे लिंग बदलून लिहा : 1

- बंधू
- कन्या

42. खालील कोणत्याही **एका** शब्दाचे वचन बदलून लिहा : 1

- रस्ता
- फांद्या

43. खालील कोणत्याही **एका** शब्दाचे विशेषण लिहा : 1

- मखमल
- प्रसिद्धी

44. खालील कोणत्याही **एका** शब्दाचा समानार्थी शब्द लिहा : 1

- उन्माद
- पापभिरू.

पुढील उतारा वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा : 5

माणूस प्रथम पृथ्वीतलावर मोठमोठ्या प्राण्यानी घेरला गेलेला होता आणि त्यानां घाबरून राहत होता. आज माणूस प्राण्यांचा स्वामी बनला आहे. आता त्याच्याकडून जे काम करून घेण्याची तो इच्छा करतो, ते काम तो करून घेतो. तो कित्येक प्राण्यांना पाळतो, जसे की घोडा, गाय, कुत्रा, मांजर आणि इतर अनेक. माणूस कित्येकांना खातो तर सिंह, वाघ इत्यादी जनावरांची मजेखातर शिकार सुद्धा करू लागला. पण जेव्हा माणसाला पर्यावरणाच्या दृष्टीने प्राण्यांचे महत्व समजले तेव्हा प्राण्यांच्या शिकारीवर त्याने कायद्याने बंदी आणली, प्रारंभीच्या काळात माणूस प्राण्यांचा स्वामी नव्हता; उलट त्या जनावरांची तो शिकार बनत असे. मोठ्या जनावरांपासून तो दूर राहण्याचा प्रयत्न करीत असे. हळूहळू कोणत्या ना कोणत्या रीतीने माणसाने स्वत:ची उन्नती करून घेतली व तो इतका शक्तिशाली बनत गेला की आज तो दुसऱ्या कोणत्याही प्राण्यांपेक्षा सामर्थ्यवान झाला आहे. त्याने हे कसे साधले शारीरिक बळावर नव्हे कारण हत्ती त्याच्यापेक्षा कितीतरी ताकतवान आहे. हे घडले बुद्धीच्या सामर्थ्यामुळे.

45. पृथ्वीतलावर माणूस कोणाला घाबरत होता ?

46. माणूस प्राण्याकडून कोणते काम करून घेतो ?

47. आज माणूस कशाच्या सामर्थ्यामुळे इतर प्राण्यांपेक्षा सामर्थ्यवान झाला आहे ?

48. शिकारीवर कायद्याने बंदी केव्हा आणली ?

49. माणसाने शक्तिशाली बनण्यासाठी काय केले ?

पुढील उतारा वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा : 5

जगातील लक्षावधी लोक आंधळे आहेत. पूर्वी लोकांना वाटत असे की आंधळ्यासाठी काहीही करता येणे शक्य नाही आणि त्यांचा काही उपयोग नाही. इतकेच नव्हे तर लोक असे समजत असत की आंधळी माणसे कुटुंबाला भार आहेत. लोक मानत होते भिक मागणे हे एकच काम ते करू शकतात. परंतु आज मात्र लोकांना कळले आहे की पुष्कळदा अंधत्व टाळता येण्याजोगे आणि बरे होण्याजोगे असते. आंधळी माणसे सुद्धा सामान्य माणसाप्रमाणे काम करू शकतात. पौष्टिक आहार आणि योग्य वेळी डॉक्टरांकडून वैद्यकीय मदत देऊन अनेक बालकांना अंधत्वापासून वाचवू शकतो. आज आपल्या मृत्यूनंतर आपले नेत्रदान नेत्रपेढीना (नेत्रबँकांना) करण्यासाठी लोक पुढे येत आहेत अशा रीतीने अनेक व्यक्तींना दृष्टी देण्यास ते मदत करत आहेत.

50. लोकांना आंधळ्या लोकांविषयी काय वाटत होते ?

51. अंधत्वाविषयी आज लोकांना काय कळले आहे ?

52. बालकांना अंधत्वापासून कसे वाचवू शकतो ?

53. लोक अंध व्यक्तींना दृष्टी देण्यास कसे मदत करतात ?

54. उताऱ्याला योग्य शीर्षक लिहा.

55. ग्राहक व दुकानदार यांच्यामध्ये झालेला संवाद पाच ते सहा ओळींत लिहा. 5

56. आदित्य/आदिती शेटगावकर, 'भगीरथ निवास' शिवाजीनगर, डिचोली-गोवा येथून उन्हाळ्याच्या सुट्टीत दौऱ्यावर जाण्यासाठी परवानगी मागणारे पत्रआपल्या वडिलांना लिहितो/लिहिते. सदर पत्राचा नमुना दहा ते पंधरा वाक्यांत लिहा. 5

57. खालील मुद्द्यांच्या आधारे सुमारे दहा ते पंधरा ओळींत गोष्ट लिहून तिला योग्य शीर्षक लिहा : 5

एक सिंह ........... सशाला पकडणे .......... तेवढ्यात हरीण दिसणे .......... मनात विचार येणे 'आपण हरणीला पकडू शकतो मग छोटासा ससा कशाला' सशाला सोडणे .......... हरणाच्या मागे धावणे .......... हरणिचे पळून जाणे .......... सिंह पुन्हा सशाला पकडण्यासाठी मागे येणे .......... सशाचेही पळून जाणे .......... पश्चात्ताप होणे.

**किंवा**

भगवती हायस्कूल, काणकोण गोवा येथे साजरा झालेल्या शिक्षकदिनाचा (5 सप्टेंबर) वृतान्त खालील मुद्द्यांच्या आधारे सुमारे दहा ते बारा वाक्यांत लिहा :

दिनांक व स्थळ .......... प्रमुख पाहुणे .......... प्रमुख पाहुण्यांचे स्वागत व परीचय ........ शिक्षकांचा सत्कार .......... कोणाच्या हस्ते केला .......... प्रमुख पाहुण्यांच्या भाषणातील दोन प्रमुख मुद्दे .......... सांस्कृतिक कार्यक्रम .......... आभार प्रदर्शन व सूत्रसंचालन कोणी केले.

58. कोणत्याही **एका** विषयावर अठरा ते वीस ओळींत निबंध लिहा : 7

- रेल्वे स्थानकावर एक तास
- नदीचे आत्मवृत्त
- व्यायामाचे महत्व
- माझा आवडता कलाकार.